**क्रमांक : ७७**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**बुधवार, दिनांक २० ऑक्टोबर, २०२१/आश्विन २८ शके, १९४३**

**शासकीय विश्रामगृह, महाबळेश्वर येथील कक्षबंधाचे आरक्षण**

८१. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांना कळविण्यात येते की, यावर्षी दिनांक १५ ऑक्टोबर, २०२१ ते दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ या कालावधीकरिता शासकीय विश्रामगृह, महाबळेश्वर येथील १० कक्षबंध महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. उपलब्ध असलेले कक्षबंध, आरक्षणाचा कालावधी तसेच महाराष्ट्र विधानमंडळाच्या विविध समित्या व सदस्यांची संख्या लक्षात घेता एका सदस्यांसाठी उक्त कालावधीत एका विशेष कक्षाचे फक्त तीन दिवसांचे आरक्षण उपलब्धतेनुसार प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर करण्यात येईल.

**ज्या सन्मा.सदस्यांना उक्त कालावधीत कक्षबंधांचे आरक्षण हवे असेल त्यांनी संसदीय आयुधांकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला त्यांचा लॉगईन आयडी वापरुन संगणक प्रणालीवर संपूर्णतः Online पध्दतीने, ज्या दिवसाकरिता आरक्षण हवे असेल त्याच्या कमीत कमी तीन दिवस अगोदर आरक्षण करावे** अशी त्यांना विनंती करण्यात येत आहे. आरक्षण केवळ ऑनलाईन पद्धतीने करता येईल. पत्राद्वारे किंवा ऑफलाईन पध्दतीने आरक्षणाची सुविधा उपलब्ध असणार नाही.

विधानमंडळ सचिवालयाकडे सुपुर्द करण्यात आलेले विधानमंडळ सदस्य व विधानमंडळ समित्यांवरील सदस्यांसाठी राखीव असल्याने विधानमंडळ समित्यांच्या बैठकी महाबळेश्वर येथे घ्यावयाचे ठरविल्यास संबंधित समिती सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्यांसाठी आरक्षित केलेल्या कक्षाबंधाचे आरक्षण रद्द करण्याचे अधिकार महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाने राखून ठेवले आहेत.

---

**विधानभवन,**
मुंबई,
दिनांक : २० ऑक्टोबर, २०२१

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव**
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२) मा.सभापती व मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव व खाजगी सचिव.
३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.
४) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
६) संगणक कक्ष ( Website )